**कामगार उप आयुक्त कार्यालय, रायगड या कार्यालयाकरिता जागा भाडेतत्त्वावर घेण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: अर्थसं-१२२५/प्र.क्र.३०९/कामगार-८**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ०४ जून, २०२६.

**वाचा :-**

कामगार आयुक्त यांचे पत्र क्र. आस्था/रायगड जागा/२०२६/कार्या-३/९९२,९९३,२०० दि.२६.०२.२०२६.

**प्रस्तावना:**

कामगार उप आयुक्त कार्यालय, रायगड हे सद्य:स्थितीत विघ्नहर्ता कॉम्प्लेक्स, पहिला माळा, जुना मुंबई पुणे महामार्ग, सेक्टर-१, खांदा कॉलनी, नवीन पनवेल-४१०२०६ येथे भाडे तत्वावर कार्यरत आहे. कार्यालयीन जागेचे मालक श्री. विकास भामरे यांनी वारंवार पत्रव्यवहार करुन कामगार उप आयुक्त, रायगड यांना सदर जागा खाली करण्याबाबत विनंती केली होती. त्यास अनुसरुन, कामगार आयुक्त यांनी हार्मोनी सीएचएस, प्लॉट नंबर ६, सेक्टर ८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल येथील जागा भाडेतत्वावर घेण्याबाबत दि.२६.०२.२०२६ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केला होता. सबब, कामगार उप आयुक्त, रायगड यांचे कार्यालय हार्मोनी सीएचएस, प्लॉट नंबर ६, सेक्टर ८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल येथील जागा भाडे तत्वावर घेण्यास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

कामगार उप आयुक्त, रायगड कार्यालयासाठी हार्मोनी सीएचएस, प्लॉट नंबर ६, सेक्टर ८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल येथील २३००.०० चौ. फूट जागा प्रतिमाह रु.१,७२,५००/- (रु. एक लाख बहात्तर हजार पाचशे फक्त) (महानगरपालिका किंवा इतर स्थानिक स्वराज्य संस्थाच्या करांव्यतिरिक्त) इतक्या दराने ३ वर्षांच्या कालावधीकरिता भाडे तत्त्वावर घेण्यास खालील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

१) कामगार उप आयुक्त, रायगड यांनी विहित नियमानुसार जागा मालकासोबत भाडेकरार करण्याबाबत कार्यवाही करावी.

२) सदर कालावधीत कोणतीही अधिकची भाडेवाढ अनुज्ञेय राहणार नसल्याचे कामगार उप आयुक्त, रायगड यांनी करारनाम्यात तरतूद करणे आवश्यक आहे.

३) भाडेकरार मुदत संपुष्टात येण्यापूर्वी कामगार उप आयुक्त, रायगड यांनी विहित कालावधीमध्ये पर्यायी व किफायतशीर दरामध्ये जागा उपलब्ध करुन घेण्याबाबत प्रयत्न करावेत.

२. कामगार उप आयुक्त कार्यालय, रायगड या कार्यालयासाठी जागा मालक प्रतिनिधी श्री.अनिल बगडिया यांच्यासोबत करावयाच्या भाडेपट्टा करारनाम्यावर शासनाच्या वतीने स्वाक्षरी करण्यास कामगार उप आयुक्त, रायगड यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. कामगार उप आयुक्त कार्यालय, रायगड या कार्यालयाच्या भाडेपोटी येणारा खर्च मागणी क्र. "के-४, २२३० कामगार व सेवायोजन (०१) कामगार (००१) संचालन व प्रशासन (००) (०१) कामगार उप आयुक्त (प्रादेशिक) (२२३० ०४२३) १४-भाडेपट्टी व कर" या लेखाशिर्षाखालील त्या-त्या आर्थिक वर्षातील उपलब्ध तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ मधील भाग पहिला, उप विभाग-एक, अनुक्रमांक १०, नियम क्र.११५ आणि महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम १९६५ मधील नियम १४७ (क) खालील टीप-१ अन्वये असलेल्या अधिकारान्वये तसेच, वित्त विभागाच्या (व्यय-१६) कार्यासनाच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०६०४१४५८५२४३१० असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SWAPNIL
YASHWANTRAO
KAPADNIS

Digitally signed by SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELMD, 2.5.4.20=3389518A88AF500EF17FD52858804C56D5B0DB93CE68C9638764849614F0C8B3, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=824DB7B32ED13AAC7B6F1F11E717770B52D6784F2BC41DDF0E4E9729CDB96F88, cn=SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS
Date: 2026.06.04 14:59:33 +05'30'

**(स्वप्निल कापडणीस)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
२. मा.राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
३. महालेखापाल, (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
४. कामगार आयुक्त, कामगार भवन, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
५. अपर कामगार आयुक्त, कोकण विभाग.
६. कामगार उप आयुक्त, रायगड.
७. कामगार उप आयुक्त (प्रशासन), मुंबई.
८. प्रधान सचिव, (कामगार) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
९. जिल्हा कोषागार अधिकारी, रायगड.
१०. कक्ष अधिकारी (व्यय-१६), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. कक्ष अधिकारी, प्रशा-१, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. निवडनस्ती (कामगार-८)